NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

दिनांक ११.११.२०२६ बुधवार

(कामगिरी)

१) गुन्हेशाखा सामाजिक सुरक्षा विभाग पथक पोलीसांची कामगिरी :– देहव्यवसाय करवुन घेणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक १०.११.२०२६ चे १७.२० वा ते २१.२० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा सामाजिक सुरक्षा विभाग पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना अवैध देहव्यवसायाबाबत मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, त्यांनी पोलीस ठाणे राणा प्रतापनगर हद्दीत, छत्रपती चौक, वर्धा रोड, निरज डेकोर समोर, सार्वजनिक रोडवर पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे आरोपी नामे तुषार प्रमोद फुलकारी, वय ३२ वर्षे, रा. दर्शन रेसीडन्सी, आर्वी नाका, कारला रोड, वर्धा हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एका पिडीत महिलेला कमी वेळात जास्त पैसे कमविण्याचे आमिष देऊन व देह व्यापारास प्रवृत्त करून, ग्राहक व जागा उपलब्ध करून देताना समक्ष मिळून आला. आरोपीचे ताब्यातुन रोख २,०००/–रू., ०१ मोबाईल फोन व इतर साहित्य असा एकुण किंमती अंदाजे १२,०००/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच, घटनास्थळावरून एका पिडीत महीलेची सुटका करण्यात आली. आरोपीविरूध्द पोलीस ठाणे राणा प्रतापनगर येथे कलम १४३(२) भा.न्या.सं., सहकलम ३,४,५ अनैतिक देहव्यापार प्रतिबंधक अधिनीयम–१९५६ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव राणा प्रतापनगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. दर्शन पाटील, सपोनि. भगवान कोळी, सफौ. दीपक बिंदाणे, पोहवा. प्रकाश माथनकर, सुनिल वाकडे, मपोहवा. लता गवई व मपोअं. पुनम शेंडे यांनी केली.



२) वाठोडा पोलीसांची कामगिरी :– जुगार खेळणाऱ्या आरोपींना अटक.

दिनांक ११.११.२०२६ चे ०१.१५ ते ०१.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे वाठोडा येथील पोलीसांचे पथक हे अवैध धंद्यांवर कारवाई करण्याचे उद्देशाने पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस ठाणे हद्दीत पवनपुत्र नगर येथील संकटमोचन हनुमान मंदीर जवळ, रोडच्या कडेला मोकळ्या जागेत काही इसम ताशपत्त्यांवर पैशांची बाजी लावून हार–जीतचा जुगार खेळत आहेत. अशा प्राप्त माहितीवरुन घटनास्थळी पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, त्याठिकाणी आरोपी क्र. १) बदनसिंग फुलसिंग उरसे, वय ४२ वर्षे, रा. प्लॉट क्र. ५०, पवनपुत्र नगर, वाठोडा, २) सोनु संतराम गुप्ता, वय २८ वर्षे, रा. रामनगरी झोपडपट्टी, सिम्बॉयसिस कॉलेज समोर, वाठोडा, ३) आकाश अरविंद मडावी, वय २१ वर्षे, रा. आजाद नगर, चेरी कंपनी जवळ, वाठोडा, ४) याकुब कुद्दुस शेख, वय २५ वर्षे, रा. प्रधानमंत्री आवास योजना, बी/५६, ३०६, गेट क्र. ०२, वाठोडा, ५) दिलशान अली शेर खान, वय २० वर्षे, रा. आजाद नगर, पीएम आवास योजनेसमोर, वाठोडा, ६) इरफान आवेश खान, वय २४ वर्षे, रा. आजादनगर, पीएम आवास योजनेसमोर, वाठोडा, ७) राकेश बाळु शिंदे, वय ३५ वर्षे, रा. प्रधानमंत्री आवास योजना, बी/२, ४०६, गेट क्र. ०१, वाठोडा, ८) रवि प्रयाग कुशवाह, वय ३७ वर्षे, रा. पवनपुत्र नगर, गली क्र. १, वाठोडा, नागपुर हे ताशपत्यावर पैश्यांची बाजी लावुन हार–जीतचा जुगार खेळतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे ताब्यातुन अंगझडती व डावावरुन रोख २,७५०/–रू. , ५२ ताश पत्ते, ०३ वेगवेगळ्या कंपनीचे मोबाईल व इतर साहित्य असा एकुण १९,७५०/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींविरूध्द पोलीस ठाणे वाठोडा येथे कलम १२ महा. जुगार प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण विभाग) नागपूर शहर, मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (कळमना विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. प्रमोद पोरे, पोउपनि. प्रकाश मौर्य, पोहवा. राजेश बहादे, गणेश बोंदरे, पोअं. चेतन उतखेडे, सुरेंद्र बेदुरकर व मपोअं. मयुरी नैताम यांनी केली.

(गुन्हे)

१) पोलीस ठाणे कळमना :– शस्त्रासह धुमाकुळ घालणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक १०.११.२०२६ चे २३.३० वा. चे सुमारास, कळमना पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, चिखली उड्डाण पुलाखाली, आरटीओ ऑफीस समोर, सार्वजनिक रोडवर एक इसम त्याचे हातात शस्त्र घेवुन, येणाऱ्या–जाणाऱ्या लोकांना शिवीगाळी करून धुमाकुळ घालतांना दिसुन आला. पोलीसांचे पथक त्याचेकडे जात असता, तो पोलीसांना पाहुन पळण्याचे तयारीत असता, त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले व त्याचे हातातील कोयता काढुन घेवुन, त्यास नि:शस्त्र केले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव मनिष सुरेश डेहरे, वय २२ वर्षे, रा. डिप्टी सिग्नल, शिवशक्ती हनुमान मंदीर जवळ, कळमना, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन एक लोखंडी कोयता किमती ३,००/–रू. जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने लोखंडी कोयता घेवुन धुमाकुळ घालतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोअं. प्रफुल्ल गोहोकार यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमना येथे सपोनि. अजय जाधव यांनी आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह. का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे बेलतरोडी :– चोरी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक ०७.११.२०२६ चे ०८.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत, औरम, शिवब्रायटन टाऊनशिप, फ्लॅट क्र. ५०१, आकाश कालसकर यांचे घरी किरायाने, खापरी पुर्नवसन, वर्धा रोड, नागपूर येथे राहणारे फिर्यादी प्रशांत चरणदास सहारे, वय ४० वर्ष यांनी मित्रामार्फतीने अमेरीकेहुन मागविलेला मोबाईल घेण्याकरीता तसेच, मुलांना दिवाळीच्या सुट्टया असल्याने आपले राहते फ्लॅटला कुलुप लावुन मित्राकडे बॅगलोरला गेले होते. दिनांक ०८.११.२६ चे २१.४५ वा. त्यांचे राहते इमारतीतील फ्लॅट क्र. ३०१ मध्ये राहणारे गोपाल रावत यांनी फिर्यादीस फोनद्वारे कळविले की, ''तुमच्या राहते फ्लॅटचे गॅलरीत आग लागलेली आहे.'' आग विझविणे गरजेचे असल्याने फ्लॅटची चाबीबाबत विचारले असता, फिर्यादीने त्यांना दरवाजा तोडण्याची परवानगी दिली. इमारतीतील लोकांनी फिर्यादीचे फ्लॅटचा दरवाजा तोडुन, अग्नीजन्य वस्तु बाहेर काढुन, फायरबिग्रेडच्या मदतीने आग विझवली. दुसरे दिवशी फिर्यादीची मेहुणीला फिर्यादीने व्हिडीयो कॉल करुन घरातील सामान बघण्यास सांगितले असता, घरातील लाकडी आलमारीचे ड्रॉव्हरमध्ये ठेवलेल्या पाऊच मधील सोन्या–चांदीचे वेगवेगळे दागिने किमती अंदाजे ३,१५,६५०/–रू. चा मुद्येमाल दिसुन आला नाही. कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते फ्लॅटमध्ये आग विझविण्याकरीता तोडलेल्या उघडे दारातुन प्रवेश करुन नमुद वर्णनाचा मुद्देमाल चोरून नेला.

अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे पोउपनि. किशोर मालोकर ९८२२२३१८३१ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

(अकस्मात मृत्यु)

पोलीस ठाणे गणेशपेठ :– दिनांक १०.११.२०२६ चे २२.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे गणेशपेठ हद्दीत, कॉटन मार्केट वाहतुक शाखेसमोरील फुटपाथवर एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ४० ते ४५ वर्षे, रंग–सावळा, चेहरा–गोल, बांधा–मजबुत, उंची–अंदाजे ५ फुट ३ इंच, केस–काळे व वाढलेले, दाढी मिशी–काळी व वाढलेली, अंगात–मरुन रंगाचा चौकडीचा फुलबाहीचा शर्ट व ग्रे रंगाचा जिन्सपॅन्ट घातलेल्या वर्णनाचे ईसम बेशुध्द अवस्थेत मिळुन आले. त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले. मृतकाचे नातेवाईकांची ओळख अद्याप पटलेली नाही. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे गणेशपेठ येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी सरतर्फे फिर्यादी पोअं. रामदास पवार यांचे सुचनेवरून पोलीस ठाणे गणेशपेठ येथे पोउपनि. अमित शेळके ९०७५६१७८१७ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

स्वा/–
(अमित देशमुख)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.